
आधुनिक विचारांचे

# वर्तमान


बीड । शुक्रवार, १७ सप्टेंबर २०२१ । वर्ष : ३ — आपले वृत्तपत्र, आपला आवाज — पुरवणी अंक । पाने : ४ । मूल्य २ ₹


लोकनेते, विकासमहर्षी
स्व.सुंदरराव सोळंके साहेब
यांच्या जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन
: संपादक


# समृद्ध-संपन्न माजलगावचे शिल्पकार





बीड जिल्ह्याच्या राजकारणात ज्यांना आदराने साहेब ही उपाधी लाभली ते सुंदररावजी सोळंके यांचे कसे होते बालपण. विकासाचा ध्यास असलेले लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी जनमाणसांवर आपली छाप उमटविली आहे. त्यांच्याच कार्यकाळात माजलगाव जलाशय प्रकल्पाचे काम पूर्णत्वास गेले. त्याचबरोबर अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प मार्गी लागले म्हणून त्यांना विकास महर्षी म्हटले तर वावगे ठरणार नाही. एकंदरीत त्यांचा जीवनप्रवास यावर टाकलेला प्रकाशझोत.

**वर्तमान विशेष**

भारत देशाला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले होते, परंतु मराठवाडा निजामांच्या गुलामगिरीत मुक्त झालेला नव्हता. त्यासाठी १७ सप्टेंबर १९४८ हा दिवस उजाडावा लागला. म्हणून हा दिवस मराठवाड्यासाठी सोनियाचा दिन म्हणता येईल. त्याच बरोबर तत्कालीन बीड जिल्हा माजलगाव तालुका मोहखेड येथे एका सधन शेतकरी कुटुंबातील इंदिराबाई अण्णासाहेब सोळंके या दामपत्त्याच्या पोटी १७ सप्टेंबर १९२७ रोजी 'सुंदर' अशा पुत्ररत्नाचा जन्म झाला. हा केवळ योगायोग असला तरी कर्मयोग मात्र निश्चितच प्रेरणादायी अशा स्वरूपाचा होता. सुंदररावाचे आई-वडिलांचे छत्र बालपणीच हरवले होते. त्यामुळे त्यांचे लालनपालन ज्येष्ठ बंधू दाजीसाहेब यांनी केले. शंकरराव, वैजनाथराव, सुंदरराव हे चौघे बंधू, गवळणबाई व मंडोदरी या बहिणी होत. सुंदररावजीचे बालपण व प्राथमिक चौथीपर्यंतचे शिक्षण गावातच झाले. यामुळे येथील डोंगराळ प्रदेशातील लोकांची जिद्द, चिकाटी, कष्टाळूपणा आदि गुणांनी काटक व्यक्तिमत्त्व शैली घडलेली होती.

त्यांचे शालेय शिक्षण अंबाजोगाई येथे झाले. पुढील शिक्षण हैद्राबाद येथील उस्मानिया विद्यापीठातून इंटरमिजिएट, बी.एस्सी. व एल.एल.बी. पदवी परीक्षाही प्रथम श्रेणीतून पास झाले. यावरून त्यांच्या बौद्धिकतेचा कस लक्षात येतो. कायद्याची पदवी मिळवल्यानंतर १९५० साली त्यांचा अंबाजोगाई तालुक्यातील हातोला या गावातील श्री दौलतराव चव्हाण यांची सुकन्या 'रत्नमाला' यांच्याशी विवाह झाला. त्यांनी केज येथे वकिली व्यवसाय सुरू केला, परंतु ते संसार व वकिली व्यवसायापेक्षाही समाजातील सर्वसामान्य लोकांच्या समस्या सोडवण्यात जास्त वेळ रममाण होऊ लागले. यामुळे त्यांच्या कौटुंबिक जीवनाची सर्वस्वी जबाबदारी पत्नी रत्नमालाबाई मोठ्या ताकतीने सांभाळत. सामाजिक उन्नतीचा ध्यास आणि कायद्याचा अभ्यास असलेल्या साहेबांची १९५८ साली बीड जिल्हा लोकल बोर्डावर निवड झाली.१९६२ साली ते मोहखेड जिल्हा परिषद गटातून भरघोस मतांनी विजयी झाल्याने बीड जिल्हा परिषदेचा पहिला जिल्हाध्यक्ष होण्याचा मान त्यांना मिळाला. या मानाचा बहुमान राखण्यासाठी त्यांनी स्वतः बीड जिल्ह्यातील सर्व ग्रामीण भाग पिंजून काढला. तेथील गोरगरीब, सामान्य जनतेचे प्रश्न, सुखदुःख जाणून घेतले. लोकही त्यांच्याशी मनमोकळेपणाने संवाद साधत, त्यामुळे त्यांची जनतेशी नाळ घट्टपणे जोडली गेली. १९६७ साली बीड जिल्ह्यात सर्वत्र कम्युनिस्ट पक्षांचे वारे वाहत असताना केज विधानसभा मतदारसंघातून कॉंग्रेस पक्षाकडून साहेबांचा विजय झाला. म्हणून स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात प्रथमच शिक्षण व उद्योग खात्याचे उपमंत्री झाले, १९७० साली त्यांनी महसूल व सहकार खात्याची धुरा सांभाळली.१९७२ मध्ये गेवराई मतदारसंघातून बिनविरोध निवडून येऊन त्यांनी 'भीम'पराक्रम केला. त्यामुळे त्यांच्याकडे महाराष्ट्र राज्याचे वीज निर्मिती, ग्रामविकास आणी क्रीडा खात्याचे कॅबिनेट मंत्रिपद आले.१९७४ साली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शंकररावजी चव्हाण यांच्या काळातही त्यांना सार्वजनिक बांधकाम, विद्युत, सांस्कृतिक व ग्रामविकास खाते देण्यात आले. १९७८ साली माजलगाव मतदारसंघातून प्रचंड मताधिक्याने निवडून आल्याने त्यांची महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रीपदी निवड झाली. याप्रकारे राजकीय कारकिर्दीची १४ वर्षे यशस्वीपणे घोडदौड करत साहेबांनी संपूर्ण महाराष्ट्राचा विशेषतः बीड जिल्ह्याचा कायापालट करणारे रस्ते, परळी येथील औष्णिक विद्युत केंद्र, माजलगाव येथील जायकवाडी धरणाचा प्रकल्प, उपळी येथील कुंडलीका प्रकल्प, अंबाजोगाई, गेवराई, कडा, नवगणराजुरी आणि तेलगाव येथील सहकारी साखर कारखाने उभारून ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्ह्याची बागायतदारांचा जिल्हा म्हणून ओळख निर्माण केली. हरितक्रांती सोबतच दुग्ध प्रकल्पाच्या माध्यमातून धवल क्रांती ही घडून आणली. त्याचबरोबर बीड जिल्ह्यातील सहकार चळवळ गतीमान केली. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळताना त्यांनी शिक्षणाची गंगा ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचावी म्हणून बीड, गेवराई, माजलगाव आणि किल्लेधारूर येथे महाविद्यालये स्थापन केली. नव्हे तर शेतकऱ्यांच्या शिक्षित मुलांना मोफत नोकरी लावून दिली. यामुळे नोकरी लावून देणारे साहेब म्हणून त्यांची ख्याती सर्वत्र झाली. त्यांचा हा जनसेवेचा वसा आणि वारसा आजही त्यांची मुले माजी मंत्री प्रकाश सोळंके, धैर्यशील सोळंके आणि नातू जयसिंग सोळंके हे अगदी नेटाने चालवताना दिसतात.










लोकनेते
सुंदररावजी सोळंके साहेब
यांच्या जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन !

।। सदैव स्मरणार्थी ।।
सचिव : भालचंद्र शेंडगे

संचालक मंडळ : प्रा.प्रकाश गवते, प्रा.सुरेश झरेकर, प्रा.लतिफ पठाण, प्रा.राजेभाऊ सोळंके, प्रा.सतिष मगर, प्रा.उज्वला कदम, प्रा.बालाजी बोडके, गणेश घाटे, मिना घुमरे, बाबासाहेब राठोड, सदाशिव टेकाळे, गंगाधर मस्के, गणेश लोखंडे, गजानन नरवडे



अध्यक्ष
प्रा.गणेशनाना सोळंके

सुंदरराव सोळंके महाविद्यालय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.माजलगाव

## संपादकीय

# दुरदृष्टीचे नेतृत्व

मराठवाडा आणि संपूर्ण महाराष्ट्रात विकासपुरुष म्हणून ज्यांचा कायम दबदबा राहिला ते बीडचे भूमिपुत्र लोकनेते सुंदररावजी सोळंके यांची आज १७ सप्टेंबर रोजी जयंती साजरी करत असताना त्यांनी दिलेल्या शिकवणी आम्हाला पदोपदी जाणीव झाली पाहिजे, विकास हाच ध्यास असलेले सुंदररावजी एक चारित्र्यसंपन्न राजकारणी होते. त्यांनी विकासाच्या बाबतीत कसलीच तडजोड केली नाही. मराठवाड्यात भव्य प्रकल्प आणण्याचे श्रेय त्यांनाच जाते. बीड जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद ते महाराष्ट्र राज्याचे पहिले उपमुख्यमंत्री असा दैदिप्यमान इतिहास त्यांच्या नावावर आहे. विधायक राजकारणी असे त्यांच्या बाबतीत म्हटले तर वावगे ठरणार नाही. कृषी, सहकार, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात सुंदररावजींनी भरीव योगदान दिलेले आहे. त्यांनी केलेल्या भगीरथ प्रयत्नांमुळे आज मराठवाडा विकासाच्या वाटेवर दिसत आहे. आज सुंदररावजी सोळंके यांच्या कार्याचा वसा आणि वारसा त्यांचे चिरंजीव तथा माजी मंत्री प्रकाश सोळंके व धैर्यशील सोळंके यांच्या खांद्यावर आलेला आहे, साहेबांच्या सामाजिक बांधिलकीचा वारसा समर्थपणे पेलण्याची जबाबदारी त्यांच्यावर पडलेली आहे. साहेबांच्या पावलावर पाऊल ठेवत कार्य पुढे चालू आहे. विकासपुरुष म्हणून सुंदररावजी सोळंके यांनी सांगितलेल्या मार्गावर चालण्यातच बीड जिल्ह्याचे, मराठवाड्याचे व महाराष्ट्र राज्याचे हित आहे. जयंतीनिमित्त विकासपुरूष सुंदररावजी सोळंके यांना अभिवादन.

# माजलगाव मतदारसंघाचे विकासरत्न

**बालाघाट पर्वताच्या पायथ्याशी मोहखेड नावाचे छोटेसे टुमदार गाव. कानिफनाथ हे गावाचे आराध्य ग्रामदैवत. येथील पुण्यवंत दाम्पत्य स्व.इंदिराबाई व स्व.आबासाहेब सोळंके यांच्या पोटी दि.१७ सप्टेंबर १९२७ रोजी सुंदर पुत्ररत्नाचा जन्म झाला होता. मुलगा अतिशय देखणा, रुपवान, दिसायला सुंदर असल्यामुळे आई-वडीलांनी मोठ्या आवडीने त्यांचे नाव सुंदर ठेवले होते. परंतु त्यांचे उमलणारे सौंदर्य पाहण्यापूर्वीच नियतीने आई वडीलांचे छत्र हिरावून नेले. दाजीसाहेब, शंकरराव, वैजीनाथराव व सुंदरराव हे चार बंधू आणि गवळण, मंडोदरी या दोन बहिणी यांच्यासोबत ते लहानाचे मोठे झाले.**

शिक्षण : आदरणीय सुंदरराव सोळंके साहेबांचे प्राथमिक शिक्षण मोहखेड येथे झाले. पुढील शिक्षणासाठी मोहखेड येथील कै.बाजीराव गुरुजी यांनी अंबाजोगाईला आणले. १९४८ साली उमरगा येथे मॅट्रीक परिक्षा दिली. पुढील शिक्षणाची सोय मराठवाड्यात नसल्याने हैद्राबाद येथील उस्मानीया विद्यापीठात प्रवेश घेतला. १९५२ साली एल.एल.बी.ची पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली होती.

वैवाहिक जीवन : अंबाजोगाई तालुक्यातील हातोला गावचे सधन शेतकरी स्व.दौलतराव चव्हाण यांच्या सुकन्या रत्नमालाबाई यांच्या सोबत १९५२ साली स्व.सुंदरराव सोळंके साहेब विवाहबद्ध झाले होते. त्यांनी केज व बीड येथील न्यायालयात वकिली व्यावसाय केला. त्यांच्या दैदिप्यपान कारकिर्दीत त्यांच्या पत्नी स्व.रत्नमालाबाई यांचा सिंहाचा वाटा होता. स्व.रत्नमाला- स्व.सुंदरराव साहेबांना प्रकाश, चंद्रकांत, धैर्यशील आणि संजय अशी चार पुत्ररत्ने झाली.आपणास एखादी मुलगी असायला पाहिजे असे त्यांना मनोमन वाटे.

सक्रीय राजकारणात प्रवेश : जनसंपर्क वाढलेल्या स्व.सुंदरराव सोळंके साहेबांची १९५८ साली बीड जिल्हा लोकल बोर्डावर निवड झाली होती. १९६२ ते १९६७ पर्यत जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहीले. १९६७ साली केज विधानसभा मतदारसंघातू निवडून येथून विधानभवनात प्रवेश केला होता. स्व.वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात स्व.सुंदरराव सोळंके साहेब शिक्षण व उद्योग खात्याचे उपमंत्री झाले होते. १९७० ला महसुल व सहकार खात्याच्या राज्यमंत्रीपदाची जबाबदारी आली.

१९७२ ला केज मतदार संघ राखीव राहील्याने गेवराई तालुक्यातील दैठण येथील स्व.सयाजीराव पंडीत व शिवाजीराव पंडीत यांनी स्व.सुंदरराव सोळंके यांनी गेवराईतून निवडणूक लढवावी अशी गळ घातली. अर्ज भरल्यानंतर स्व.सुंदरराव सोळंके साहेब आपल्या सहकाऱ्यांसोबत श्री क्षेत्र भगवानगडावर गेले.तेथे त्यांनी राष्ट्रीय संत श्री भगवान बाबा यांच्या समाधीचे व महंत भिमसिंग महाराजांचे दर्शन घेतले. महाराजांनी सुंदरराव तुम्ही बिनविरोध निवडून





येणार आहात असा आशिर्वाद दिला. तो खरा ठरला. स्व.सुंदरराव सोळंके साहेब बिनविरोध निवडून आले होते. त्यांची वीज निर्मिती, ग्राम विकास व क्रिडा खात्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून वर्णी लागली.पुन्हा १९७७ ला स्व.वसंतराव नाईक यांच्या मंत्री मंडळात त्यांना मानाचे स्थान देण्यात आले. १९७८ साली माजलगाव विधानसभा मतदार संघातून विजयी झाले. या वेळी स्व.वसंतदादा पाटील याच्या मंत्रिमंडळात स्व.सुंदरराव सोळंके साहेब महाराष्ट्राचे पहिले उपमुख्यमंत्री झाले होते.

**शब्दांजली**

**प्रा.ईश्वर मुंडे**

पुरोगामी लोकशाही दल : आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांसोबत स्व.सुंदरराव सोळंके साहेब स्व.वसंतदादा पाटलांच्या मंत्रीमंडळातून बाहेर पडले.१९७८ साली मा.शरदचंद्रजी पवार साहेब मुख्यमंत्री व स्व.सुंदरराव सोळंके उपमुख्यमंत्री झाले. पुढे १९८० साली स्व.सुंदरराव सोळंके साहेबांनी जवळच्या मित्रांसह इंदिरा काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला होता. १९८० च्या अटीतटीच्या निवडणूकीत स्व.सुंदरराव सोळंके साहेबांचा १८०० मतांनी निसटता पराभव झाला होता.

विकास गंगा: अंबाजोगाई येथील सहकारी साखर कारखाना, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई, माजलगाव सहकारी साखर कारखाना, औरंगाबाद, बीड, माजलगाव, उदगीर येथे दूध शितकरण केंद्र, औरंगाबाद येथे देवगीरी टेक्सटाईल, औरंगाबाद, बीड, लातूर, परळी येथे औद्योगीक वसाहती, बीड येथे चर्मोद्योग प्रकल्प, परळी येथील औष्णीक विद्युत केंद्र, मुंबई ते विजयवाडा हा राष्ट्रीय महामार्ग बीड -तेलगाव मार्गे करण्यात यश, माजलगाव जलसिंचन प्रकल्प, मोहखेड सरस्वती जलसिंचन प्रकल्प, वाण प्रकल्प नागापूर, मांजरा प्रकल्प धनेगाव, कुंडलीका प्रकल्प उपळी, मनकर्णिका प्रकल्प सुर्डी, गुणवती प्रकल्प सिरसाळा, माजलगाव बझार यासाठी मोलाचे योगदान दिलेले होते.

१ सप्टेंबर १९५८ रोजी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. १९६९ साली स्व.सुंदरराव सोळंके साहेब यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. त्यांनी सिंदफणा पब्लिक स्कूल माजलगावची स्थापना केली होती. विकासाचा ध्यास असलेल्या सृजनात्मक नेतृत्वाची, लोकनेत्याची प्राणज्योत दि.५ नोहेंबर २०१४ रोजी मावळली.

स्व.सुंदरराव सोळंके साहेबांच्या चार पुत्ररत्नांपैकी चौथे स्व.संजयराव यांचे अपघाती निधन झाले. दुसरे चिरंजीव चंद्रकांत हे पुणे येथे व्यावसायात अग्रणी आहेत. स्व.सुंदरराव सोळंके साहेब यांच्या सामाजिक व राजकीय अपूर्ण स्वप्नांची पुर्तता करण्याचे कार्य आमदार प्रकाशदादा सोळंके, मा.धैर्यशील काका सोळंके आणि मा.जयसिंगभैय्या सोळंके करीत आहेत.

आज दि. १७ सप्टेंबर स्व.सुंदरराव सोळंके साहेबांची जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन..!



# महाराष्ट्राचे पहिले उपमुख्यमंत्री

**डॉ.उद्धव नाईकनवरे**

बीड जिल्ह्यातील मोहखेड, ता.धारूर येथे शेतकरी कुटुंबात जन्म झालेल्या सुंदरराव आबासाहेब सोळंके यांनी कायद्याची पदवी मिळवल्यानंतर केज येथे वकिली व्यवसाय सुरू केला. याच काळात १९६२मध्ये जि.प. लोकल बोर्डाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. १९६७मध्ये केजमधून पहिल्यांदा आमदार व मंत्रीही झाले. गेवराईतून बिनविरोध निवड झाल्यानंतर १९८०मध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री झाले. या काळात त्यांच्याकडे विविध खात्यांची मंत्रिपदे होती.

मंत्री व मंडळाचे अध्यक्ष असताना एकही पैसा न घेता अनेकांना नोकऱ्या दिल्या. त्यामुळे मोफत नोकरी देणारे साहेब म्हणून त्यांचा परिचय होता. विचाराशी बांधील, साधी राहणी, विकासात्मक दृष्टी त्यांनी जोपासली. असे वेगवेगळ्या कामाच्या माध्यमातून जिल्ह्याच्या विकासाची बांधिलकी जोपासणाऱ्या विकासात्मक दृष्टी असलेल्या नेतृत्वास जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!



## गहिवरले डोंगर सारे...

भगीरथ आमचे गेले
डबडबले धरण सारे!
'सुंदर' होते आजवर जे
गहिवरले डोंगर सारे!!
तुम्हीच केली तृप्त
तहानलेली माती!
हसून साखर पेरणीने
कष्टकऱ्यांशी जपली नाती!!
पोरकेपणाचे आता
पेलणार कसे आकाश!
'धैर्य' द्या तुम्हीच साहेब
राहुद्या नित्य पुणवेचा 'चंद्र-
प्रकाश'!!

सैनिक तुम्ही अक्षरांचे
जन्मलात तो ही मुक्तीदिन!
'आधारवड' असा
कोसळला
पारंबीलाही मिळो
पानांची वीन!!



**कवी : प्रभाकर साळेगावकर**

# हरितक्रांती-धवलक्रांतीचे जनक

**स्व.सुंदरराव सोळंके यांनी १९७२ मध्ये गेवराई मतदारसंघातून बिनविरोध निवडून येऊन त्यांनी 'भीम'पराक्रम केला. त्यामुळे त्यांच्याकडे महाराष्ट्र राज्याचे वीज निर्मिती, ग्रामविकास आणी क्रीडा खात्याचे कॅबिनेट मंत्रिपद आले. १९७४ साली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शंकररावजी चव्हाण यांच्या काळातही त्यांना सार्वजनिक बांधकाम, विद्युत, सांस्कृतिक व ग्रामविकास खाते देण्यात आले. १९७८ साली माजलगाव मतदारसंघातून प्रचंड मताधिक्याने निवडून आल्याने त्यांची महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रीपदी निवड झाली. याप्रकारे राजकीय कारकिर्दीची १४ वर्षे यशस्वीपणे घोडदौड करत साहेबांनी संपूर्ण महाराष्ट्राचा विशेषतः बीड जिल्ह्याचा कायापालट करणारे रस्ते, परळी येथील औष्णिक विद्युत केंद्र, माजलगाव येथील जायकवाडी धरणाचा प्रकल्प, उपळी येथील कुंडलीका प्रकल्प, अंबाजोगाई, गेवराई, कडा, नवगणराजुरी आणि तेलगाव येथील सहकारी साखर कारखाने उभारून ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्ह्याची बागायतदारांचा जिल्हा म्हणून ओळख निर्माण केली. हरितक्रांती सोबतच दुग्ध प्रकल्पाच्या माध्यमातून धवलक्रांती ही घडून आणली.**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले होते, परंतु मराठवाडा निजामांच्या गुलामगिरीत मुक्त झालेला नव्हता. त्यासाठी १७ सप्टेंबर १९४८ हा दिवस उजाडावा लागला. म्हणून हा दिवस मराठवाड्यासाठी सोनियाचा दिन म्हणता येईल. त्याच बरोबर तत्कालीन बीड जिल्हा माजलगाव तालुका मोहखेड येथे एका सधन शेतकरी कुटुंबातील इंदिराबाई अण्णासाहेब सोळंके या दामपत्त्याच्या पोटी १७ सप्टेबर १९२७ रोजी 'सुंदर' अशा पुत्ररत्नाचा जन्म झाला. हा केवळ योगायोग असला तरी कर्मयोग मात्र निश्चितच प्रेरणादायी अशा स्वरूपाचा होता. सुंदररावाचे आई-वडिलांचे छत्र बालपणीच हरवले होते. त्यामुळे त्यांचे लालनपालन ज्येष्ठ बंधू दाजीसाहेब यांनी केले. शंकरराव, वैजनाथराव, सुंदरराव हे चौघे बंधू, गवळणबाई व मंडोदरी या बहिणी होत.

सुंदररावाचे बालपण व प्राथमिक चौथीपर्यतचे शिक्षण गावातच झाले. यामुळे येथील डोंगराळ प्रदेशातील लोकांची जिद्द, चिकाटी, कष्टाळूपणा आदि गुणांनी काटक व्यक्तिमत्त्व शैली घडलेली होती. त्यांचे शालेय शिक्षण अंबाजोगाई येथे झाले. पुढील शिक्षण हैद्राबाद येथील उस्मानिया विद्यापीठातून इंटरमिजिएट, बी.एस्सी. व एल.एल.बी. पदवी परीक्षाही प्रथम श्रेणीतून पास झाले. यावरून त्यांच्या बौद्धिकतेचा कस लक्षात येतो. कायद्याची पदवी मिळवल्यानंतर १९५० साली त्यांचा अंबाजोगाई तालुक्यातील हातोला या गावातील श्री दौलतराव चव्हाण यांची सुकन्या 'रत्नमाला' यांच्याशी विवाह झाला. त्यांनी केज येथे वकिली व्यवसाय सुरू केला, परंतु ते संसार व वकिली व्यवसायापेक्षाही समाजातील सर्वसामान्य लोकांच्या समस्या सोडवण्यात जास्त वेळ रममाण होऊ लागले. यामुळे त्यांच्या कौटुंबिक जीवनाची सर्वस्वी जबाबदारी पत्नी रत्नमाला बाई मोठ्या ताकतीने सांभाळत. सामाजिक उन्नतीचा ध्यास आणि कायद्याचा अभ्यास असलेल्या साहेबांची १९५८ साली बीड जिल्हा लोकल बोर्डावर निवड झाली. १९६२ साली ते मोहखेड जिल्हा परिषद गटातून भरघोस मतांनी विजयी झाल्याने बीड जिल्हा परिषदेचा पहिला जिल्हाध्यक्ष होण्याचा मान त्यांना मिळाला. या मानाचा बहुमान राखण्यासाठी त्यांनी स्वतःबीड जिल्ह्यातील सर्व ग्रामीण भाग पिंजून काढला. तेथील गोरगरीब, सामान्य जनतेचे प्रश्न, सुख-दुःख जाणून घेतले. लोकही त्यांच्याशी मनमोकळेपणाने संवाद साधत, त्यामुळे त्यांची जनतेशी नाळ घट्टपणे जोडली गेली. १९६७ साली बीड जिल्ह्यात सर्वत्र कम्युनिस्ट पक्षांचे वारे वाहत असताना केज विधानसभा



मतदारसंघातून काँग्रेस पक्षाकडून साहेबांचा विजय झाला. म्हणून दिवंगत वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात प्रथमच शिक्षण व उद्योग खात्याचे उपमंत्री झाले, १९७० साली त्यांनी महसूल व सहकार खात्याची धुरा सांभाळली. १९७२ मध्ये गेवराई मतदारसंघातून बिनविरोध निवडून येऊन त्यांनी 'भीम'पराक्रम केला. त्यामुळे



त्यांच्याकडे महाराष्ट्र राज्याचे वीज निर्मिती, ग्रामविकास आणी क्रीडा खात्याचे कॅबिनेट मंत्रिपद आले. १९७४ साली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शंकररावजी चव्हाण यांच्या काळातही त्यांना सार्वजनिक बांधकाम, विद्युत, सांस्कृतिक व ग्रामविकास खाते देण्यात आले. १९७८ साली माजलगाव मतदारसंघातून प्रचंड मताधिक्याने निवडून आल्याने त्यांची महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रीपदी निवड झाली. याप्रकारे राजकीय कारकिर्दीची १४ वर्षे यशस्वीपणे घोडदौड करत साहेबांनी संपूर्ण महाराष्ट्राचा विशेषतः बीड जिल्ह्याचा कायापालट करणारे रस्ते, परळी येथील औष्णिक विद्युत केंद्र, माजलगाव येथील जायकवाडी धरणाचा प्रकल्प, उपळी येथील कुंडलीका प्रकल्प, अंबाजोगाई, गेवराई, कडा, नवगणराजुरी आणि तेलगाव येथील सहकारी साखर कारखाने उभारून ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्ह्याची बागायतदारांचा जिल्हा म्हणून ओळख निर्माण केली. हरितक्रांती सोबतच दुग्ध प्रकल्पाच्या माध्यमातून धवलक्रांती ही घडून आणली. त्याचबरोबर बीड जिल्ह्यातील सहकार चळवळ गतीमान केली. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळताना त्यांनी शिक्षणाची गंगा ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेपर्यत पोहचावी म्हणून बीड, गेवराई, माजलगाव आणि किल्लेधारूर येथे महाविद्यालय स्थापन केली नव्हे तर शेतकऱ्यांच्या शिक्षित मुलांना मोफत नोकरी लावून दिली. यामुळे नोकरी लावून देणारे साहेब म्हणून त्यांची ख्याती सर्वत्र झाली. लोक त्यांना आपुलकीने 'आप्पा' म्हणत. खरोखरच आपाच्या आपलेपणाची भावना जनसामान्यांच्या कार्यातून दिसून येत असे. सर्वसामान्यांचे आधारवड असलेले आणि जनसामान्यासाठी संपूर्ण आयुष्य वेचणाऱ्या साहेबांच्या कारकिर्दीबद्दल चंदनाचे हात, पायही चंदन, परिसा नाही हीन, कोणी अंग असेच म्हणावे लागेल. त्यांचा हा जनसेवेचा वसा आणि वारसा आजही त्यांची मुले श्री प्रकाशदादा सोळंके, धैर्यशीलकाका सोळंके आणि नातू जयसिंगभैय्या सोळंके हे अगदी नेटाने चालवताना दिसतात. अशा या थोर पुण्यात्म्यास जयंती निमित्त विनम्र अभिवादन..!

**प्रासंगिक**


**प्रा.डॉ.चत्रभुज कदम**

(प्रा.डॉ.चत्रभुज कदम हे औरंगाबाद येथील शिवछत्रपती महाविद्यालयात मराठी विभागाचे प्राधापक आहेत.)



# लोकनेते सुंदरराव सोळंके साहेब

**महाराष्ट्राचे पहिले उपमुख्यमंत्री, सलग पंधरा वर्ष महसूल, सार्वजनिक बांधकाम, सहकार, पणन या सारख्या महत्वाच्या खात्याच्या जबाबदाऱ्या पार पाडून महाराष्ट्राच्या विकासात मोलाचे योगदान देणारे वडवणी, धारूर, माजलगाव तालुक्यातील जनतेचे दैवत दिवंगत नेते सुंदरराव सोळंके साहेब यांची आज १७ सप्टेंबर रोजी जयंती. त्यानिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा हा लेख.**



लोकनेते सुंदररावजी सोळंके साहेबांची आज जयंती आहे. ज्यांनी आपल्या आयुष्यात केवळ सामन्य जनतेची सेवाच केली त्या साहेबांचे बीड जिल्ह्यासह संपुर्ण महाराष्ट्रावर अनंत उपकार आहेत. बालाघाटाच्या डोंगररांगेतील मोहखेड या दुर्गम ठिकाणी जन्मलेले सुंदररावजी सोळंके साहेबांनी हैद्राबादला वकीली संपादन केली खरी मात्र जास्त काळ वकीली न करता वयाच्या तेहतिसाव्या वर्षी सक्रीय राजकारणात झोकून दिले. शेतकरी सामान्य माणूस ते तळागाळातील सामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्याची कामगिरी करीत राजकारणाच्या माध्यमातुन समाजकारण, शिक्षण, सहकार व संस्कृती या क्षेत्रात त्यांनी अल्पावधीत नावलौकीक केले. त्यांच्या कामाची पावती म्हणून बीडच्या जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्षपद भुषविण्याची संधी त्यांना मिळाली. त्यानंतर त्यांच्या कारकिर्दीने उंच भरारी घेत महाराष्ट्राच्या राजगादीवरील शिक्षण, महसूल, सहकार, पणन, दुग्धविकास, सार्वजनिक बांधकाम या सारख्या महत्वपूर्ण खात्याचा कारभार तब्बल पंधरा वर्ष चालवला. महाराष्ट्राचे पहिले उपमुख्यमंत्री होण्याचा मानही त्यांनाच मिळाला.त्याचा मंत्रीपदाचा सलग पंधरा वर्षाचा काळ बीड जिल्ह्यासह मराठवाड्याचा सुवर्णयुगच ठरला. कारण या काळात रस्ते, सिंचन प्रकल्प, दुध प्रक्रिया प्रकल्प, शैक्षणिक सुविधा, औद्योगिक वसाहती, साखर कारखाने या सारख्या मोलाच्या सुविधा त्यांनी जनतेच्या घरापर्यंत पोचविल्या. घरपोच सातबारा देण्याचा

**अशोक निपटे**

अभिनव प्रयोग त्यांनीच महसुलमंत्री असताना राबविला होता. माजलगाव मतदारसंघातील जनतेसाठी त्यांनी उभारलेल्या माजलगाव सहकारी साखर कारखान्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त करुन देण्याची किमया त्यांनी केली. आपल्या प्रकाशदादा व धैर्यशिलकाका या दोन्ही मुलांना चांगल्या संस्कारीक राजकारणातुन जनसेवेचा वसा त्यांनी दिला. त्यांच्या उत्तम संस्कारामुळेच दादा व काकांनी या भागात चांगले काम करुन नावलौकीक मिळवले आहे.

सुंदररावजी सोळंके या महामानवाने आपल्या पावन स्मृती ठेवून सहा वर्षापूर्वी इहलोकीचा निरोप घेतला. त्यांचे सानिध्य मला लाभल्याने मी स्वत:ला भाग्यवान समजत आहे. माझ्या सारख्या एका छोट्या पत्रकाराला आपुलकी, प्रेम, जिव्हाळा लावून मला मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य करणारे साहेब कायम स्मरणात राहतील. जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना नतमस्तक होऊन विनम्र अभिवादन!



# माजलगाव धरणाचे 'सुंदर सागर' नामकरण करावे : ॲड.प्रमोद तौर

▶ प्रतिनिधी

माजलगाव : महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे सुपूत्र लोकनेते दिवंगत सुंदरराव सोळंके यांचे माजलगाव धरणाला 'सुंदर सागर' असे नामकरण करावे, अशी मागणी जोर धरत आहे. महाराष्ट्र मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, जलसंपदा मंत्री जयंत पाटील, बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांना निवेदन देवून राष्ट्रवादी काँग्रेसचे माजलगाव तालुका सरचिटणीस ॲड.प्रमोद तौर यांनी केली आहे.

महाराष्ट्र जडणघडणीत लोकनेते सुंदरराव सोळंके यांचे मोठे योगदान आहे. मराठवाड्याचे भूमिपुत्र म्हणून सुंदरराव सोळंके यांनी विकासाची गंगा खेचून आणली. महाराष्ट्र राज्याच्या तत्कालीन



सरकारमध्ये मंत्रीमंडळात सुंदरराव सोळंके उपमुख्यमंत्री पदावर कार्यरत असताना अतिशय प्रभावी काम केलेले आहे. यात विविध खात्यांचे मंत्री असताना सामान्य माणसांच्या जीवनात अमूलाग्र बदल होईल, असे अनेक लोककल्याणकारी प्रकल्प सोळंके यांनी उभे केले. सोळंके यांच्या पाठपुराव्यामुळे माजलगाव धरण पूर्णत्वास केले. माजलगाव धरण्याच्या उभारणीमुळे तालुक्यातील सिंचनक्षेत्र वाढवून हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली आली. यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात हरितक्रांतीचे स्वप्न सत्यात उतरले. माजलगाव धरणाबरोबरच मांजरा, कुंडलिका आणि सरस्वती सारखे अनेक जलप्रकल्प कार्यान्वित झाले. त्यामुळे विकासाभिमुख लोकनेते दिवंगत सुंदरराव सोळंके यांच्या नावाने माजलगाव धरणाचे 'सुंदर सागर' असे नामकरण करण्यात यावे, अशी मागणी ॲड.प्रमोद तौर यांनी केली आहे.















# लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि.सुंदरनगर

पो.तेलगाव ता.धारुर जि.बीड

**एम.डी.घोरपडे** (कार्यकारी संचालक) | **आ.प्रकाशदादा सोळंके** (ज्येष्ठ संचालक) | **धैर्यशीलकाका सोळंके** (चेअरमन)

* संचालक मंडळ *

श्री.भागवतराव एकनाथराव देशमुख, श्री.दिपकराव उत्तमराव सोळंके, श्री.यशवंतराव दगडोबा नायबळ, श्री.शिवाजीराव किशनराव थावरे, श्री.प्रकाशराव साहेबराव शिंदे, श्री.प्रभाकरराव रुस्तूमराव पौळ, श्री.मुंजाबा साहेबराव तौर, श्री.सोपानराव श्रीराम सोळंके, श्री.दत्तात्रय पुसाराम दुधाने, श्री.भगवानराव गंगाधर लंगे, श्री.ज्ञानेश्वर वामनराव होरमाळे, श्री.विष्णु भागूराम निरडे, श्री.आबासाहेब बाबासाहेब गायकवाड, श्री.लोभा भाऊसिंग चव्हाण, श्री.तुषार वसंतराव घाटुळ, श्री.छगनराव रावसाहेब जाधव, श्री.शिवाजीराव श्रीरंग बडे, सौ.शशिकला अंकुशराव गांडगे, सौ.अनुसया गोरखनाथ डाके

आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.